समंधबाधा, भूतबाधा निवारणारी नवनाथ उपासना

संपादक : द. शं. केळकर

योगी अ. ल. भागवतांनी अनुष्ठानाने सिद्ध केलेली व अद्भुत फळ देणारी यंत्रे

(१) **धनदा यंत्र** : हे यंत्र योगी अ. ल. भागवतांना श्रीदत्ताचे विख्यात पवित्र स्थान (लाडाचे) कारंजे येथील एका अतिवृद्ध व विद्वान अशा दशग्रंथी ब्राह्मणाने दिले आहे. हे यंत्र जवळ बाळगणारा धनवान, संपत्तिवान होतो. हे यंत्र खिशात ठेवावे.

(२) **कार्यसिद्धी यंत्र** : हे रोमन काळातील यंत्र असून फार प्राचीन काळापासून अतिशय गुप्तपणे रोमन राजेलोकांत, सरदारांत, या यंत्राचा उपयोग केला जात होता. हे यंत्र जवळ बाळगणाऱ्यास कधीच दारिद्र्य येत नाही. घरात समृद्धी व शांती नांदते असा अति प्राचीन काळापासून लोकांचा अनुभव होता. हे यंत्र कामानिमित्त बाहेर जाताना जवळ बाळगले तर कोणतेही कार्य निश्चित यशस्वी होतेच होते; हाताला नेहमी यश असते.

(३) **श्रीयंत्र** : अतिप्राचीन काळापासून आर्यांना श्रीयंत्राची महती माहीत होती. आद्यशंकराचार्यांनी या लुप्त झालेल्या श्रीयंत्रविद्येचा हिरिरीने प्रचार केला. हे यंत्र प्राचीन हिंदुराजे आपल्या देवपूजेत नित्यनियमाने ठेवत. आजही कोल्हापूरच्या देवपूजेत हे यंत्र असतेच असते. या यंत्राचा महिमा अगाध व अथांग आहे. त्याची महती शब्दाने व्यक्त करता येणार नाही.

समंधबाधा, भूतबाधा निवारणारी
नवनाथ उपासना

आमची अद्‌भुत प्रकाशने

पातञ्जल योगदर्शन	१५ रु.
तिबेटी योगविद्या	१५ रु.
नवनाथ तत्त्वज्ञान आणि उपासना	१८ रु.
दारिद्र्यहरण करणारी नवनाथ उपासना	१·५० रु.
संकट निवारण करणारी स्तोत्रे व मंत्र	४ रु.
पिशाच्च विद्या	१० रु.
श्रीउपासना	४ रु.
सुख समृद्धीसाठी श्री दत्तउपासना	६ रु.
मंत्रमहोदधी अर्थात वशीकरणविद्या	६ रु.
मंत्राने संकट निवारण	६ रु.
भविष्यचंद्रिका	१५ रु.

प्रकाशक : गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन, २० E कवळीवाडी, चितळे पथ, दादर, मुंबई २८

मुद्रक : शशिकांत महादेव देव, सुलभ मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे ३०

किंमत १·५० रु.

समंधबाधा, भूतबाधा निवारणारी नवनाथ उपासना

भूत, समंध आहे कीं नाहीं ही आतां वादातीत बाब झाली आहे. आपल्याकडेच नांहीं तर पाश्चात्य देशांत ह्याचा अनुभव येतो. विज्ञानानें ही गोष्ट सिद्ध झाली आहे. माणूस मरतांना त्याच्या इच्छा राहिल्या कीं त्याच्या मनोमय देहाचे विसर्जन न झाल्यामुळें, त्याची कांहीं काळ कुतरतोड होते. त्याच्या जागेवर, त्याच्या वस्तूचा दुसऱ्याने अपहार केला असेल, त्याला तें असाहाय्य होतें. मग तो मनोदेहानें दुसऱ्या व्यक्तीच्या देहांत प्रवेश करून त्रास देतो. कांहीं मृतात्मे राहण्याच्या जागीं म्हणजे वास्तूंत त्रास निर्माण करतात. किंवा अनेक गोष्टींनीं त्रास करतात.

मी माझ्या गुरूकडे राममंत्रानें अनेकांचीं भूतें दूर केलीं आहेत. अनेक लहान बालकांना होणारा पिशाच्च्याचा त्रास दूर केला आहे. मला एक भूत काढण्याचा मंत्र मिळाला होता. मंत्र श्रीदत्तमहाराजांचा होता. त्या वेळी मी मॅट्रिकच्या मुलांना इंग्रजी, संस्कृत व गणित हे विषय शिकवत होतों. ह्या विषयांत माझे शिष्य बोर्डांत तसेंच विश्वविद्यालयांत चमकले आहेत. ह्या काळांत माझा एक शिष्य प्रसाद परुळकर हा शिकायला येत असे. आम्ही त्या वेळीं संमोहन शास्त्राचा अभ्यास केला होता व त्याला ही विद्या शिकवली होती. आम्ही एका मुलाला संमोहन करून त्याला पाठवून प्रश्नपत्रिका मनोमन देहाने, मिळवण्याचे प्रयोग केले होते. मनोमन देह कुठेंही जाऊं शकतो. तेव्हां प्रसाद परुळकर म्हणाला, " आमच्या शाळेंतील बन्या बर्वे हा मुलगा शाळेंत फिट्स येऊन पडतो. त्यावर आपण उपाय करूं या. असें शाळेंत चारदां झालें. " मी

त्याला आमच्या घरीं आणायला सांगितलें. आम्ही तांदूळ मंत्रवून त्याच्यावर मारले. तोंच त्याच्या अंगांत एका ब्राह्मण समंधानें संचार केला व तो मोठ्यानें बोलू लागला. "ह्या मुलाच्या आजीनें माझा विश्वासघातानें खून केला आहे. ह्याच्या आईला मी वेडी करून टाकली आहे. ह्याच्या बहिणीला मी जाळून मारली आहे. (ही बहीण प्रसिद्ध नाटककार नागेश जोशींशीं लग्न करणार होती. त्या दोघांचें एकमेकांवर प्रेम होतें.) ह्या मुलालाही मी मारणार आहे." त्याबरोबर परत तांदूळ मंत्रवून मी मारले. तेव्हा तो ब्रह्मसमंध म्हणाला, "मला हे सहन होत नाही. तुम्ही द्विजश्रेष्ठ आहां. मी शरण आलों आहें." मी त्याला ह्या मुलाला धरून तुला काय फायदा होणार आहे ? असें विचारलें असतां तो सूडानें हें करत आहे असें म्हणाला. मी त्या मुलावर परत तांदूळ मंत्रवून मारले व त्याला तूं ह्या भूत·देहांत राहून तुझें कल्याण होणार नाहीं असें सांगितलें व त्याला नरसोबाच्या वाडीस जाण्यास व तेथें रोज आंघोळ मनोमय देहानें करण्यास सांगितलें. ह्या काळांत मी ह्या मुलाच्या वडिलांना गुरुचरित्राचे सात सप्ताह करायला सांगतों, असें सांगितलें व ब्रह्मसमंधाकडून तसें वचन घेतलें. त्याप्रमाणें तो ब्रह्मसमंध त्या मुलाला कायमचा सोडून गेला. ह्या मुलाचें नांव रमेश बर्वे असें असून तो आतां गोवा नभोवाणी केंद्रावर नाटकें व इतर गोष्टी सादर करतो. कै. सखाराम बर्वे नाटककार ह्यांचा हा मुलगा आहे.

माझ्या शालेय जीवनांत गूढशास्त्राचा अभ्यास होता. लोकांना मी अनुभव देत होतों. सावंतवाडींत आत्मेश्वर मंदिर म्हणून जागृत देवस्थान आहे. त्याच्यासमोर एक तळी आहे. ह्या तळीचें वैशिष्ट्य म्हणजे पाणी जमिनीच्या सपाटी-वर आहे. ह्या देवळाजवळ श्री. नाना नेरूरकर हे गृहस्थ राहात आहेत. आतां ते फार म्हातारे झाले आहेत. त्यांच्या मुलीचें लग्न झालें. लग्न होऊन मुलगी हळद असतांना बोटीवर चढली. बोटीवर चढल्यावर त्या मुलीच्या अंगांत

मृतात्म्यानें संचार केला ती मुलगी बोटींतच दागिने काढून टाकूं लागली. नवऱ्यानें मुंबईला आपल्या राहण्याच्या जागीं नेलें तरी तिचा त्रास फारच वाढला. ती अनेक भाषा बोलायची. त्या मुलीनें मराठीशिवाय कोणतीच भाषा वाचली किंवा शिकली नव्हती. नवऱ्यानें आठ दिवसांत तिला माहेरी सावंतवाडीस आणलें. मला श्री. नेरूरकरांनीं बोलावल्याबरोबर मी नवनाथाचा पांचवा अध्याय घेऊन गेलों. अध्याय वाचूं लागलों तशी ती चिडूं लागली. जियें शपथा आहेत, तियें हात जोडूं लागली. मी उदबत्त्या लावून तीनदां अध्याय वाचला. भूताबरोबर दैवी उपासक म्हणून झगडा देण्याचा हा माझा पहिलाच लहानपणांतील प्रयोग होता. तिच्या ओरडण्यानें मी घाबरलों होतों. पण अध्याय वाचूं लागलों तशी तिची नम्रता पाहून मी जिंकल्याचें माझ्या निदर्शनास आलें. तिसऱ्या वाचनाला मला नमस्कार करून ती झोंपली. मी तिच्या नवऱ्याला सहा महिने अध्याय वाचण्यास सांगितलें. तेथून नवरा तिला आपल्या घरीं घेऊन गेला. त्यानें सहा महिने वाचन करण्या-ऐवजीं एक महिना वाचन करतांच ती संपूर्ण बरी झाली व ती आपल्या नवऱ्याबरोबर मुंबईस गेली.

कुडाळला निवजेकर म्हणून एक कारकून राहात असे. त्याच्या घरांत भांड्याला भांडें आपटत असे, दार आपो-आप उघडे, जेवणांत विष्टा किंवा सुयांचा झुपका सापडायचा. त्यांना नवनाथ अध्याय ५ वा वाचायला सांगून सहा महिन्यांत त्यांच्या घरची अडचण व त्रास कायमचा दूर झाला.

कोल्हापूर राजारामपुरींत एका मराठा गृहस्थानें नवें घर हौसेनें बांधलें. त्याचे दोन मुलगे तियें रहायला गेल्या-पासून वेडे झाले. भिंतीवर आवाज होऊं लागले. अनेक प्रकारें त्रास होऊं लागला. घरांत राहणें अशक्य होऊं लागलें.

त्यांना आम्ही नवनाथ अध्याय ५ वा ६ महिने दिवसांतून तीनदां वाचायला सांगितला. त्यानें त्या गृहस्थाची तक्रार दूर झाली व मुलेही चांगली झाली.

गोमंतकांत एका मुलाच्या खिशांत दगड सापडायचे. घरांतील पैसे जायचे. अनेक प्रकारें घरांत त्रास व्हायचा. तेव्हां त्या मुलाचे वडील त्या मुलाला घेऊन माझ्याकडे आले. मी त्यांना असें सांगितलें कीं, मी माझ्या आईला शब्द दिला आहे कीं आमच्या घराच्या मर्यादेत मी पिशाच्च काढणार नाही. श्री. रमेश बर्वे ह्यांच्यावरील ब्रह्मसमंध जेव्हां बोलूं लागला तेव्हां आमच्या घराजवळ खूप गर्दी झाली होती. आमची आई म्हणाली, " तूं हीं पिशाचें काढलींस तर तूं जिवंत असे-पर्यंत तीं कांहीं करणार नाहींत; आपल्या घराच्या मर्यादेबाहेर तीं राहतील; पण तुझ्या निधनानंतर इथें राहणाऱ्या व्यक्तींना त्रास देतील. तेव्हां मला असें वचन दे कीं, स्वतः यापुढें पिशाच्च काढणार नाहीं." त्याप्रमाणें मी आजवर वागत आलों आहें. पिशाच्चबाधा दूर होण्यासाठीं मी मंत्र व उपासना सांगतों. त्यांस नवनाथाच्या ५ व्या अध्यायाचें दिवसांतून तीनदां वाचन करायला सांगितलें. ह्या मुलाच्या वडिलांनीं त्याप्रमाणें केलें आणि त्यांच्या मुलाचा व घरचा त्रास दूर झाला. गोव्याच्या वृत्तपत्रांत ह्या मुलाच्या ह्या भयानक अवस्थेची चर्चेची व खळबळजनक बाब झाली होती. भूत व समंधबाधा निवारणाचे अनेकांना आम्ही दाखले दिले असून महाराष्ट्रांतच नव्हे तर इतर प्रांतांतही ह्याचा अनुभव दिला आहे. त्या साऱ्यांचा उल्लेख करावयाचा म्हणजे मोठें पुस्तक लिहावें लागेल.

सावंतवाडींत माठेवाड्यांत हळबे मास्तर म्हणून एक दत्तभक्त होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या घरांतील लाडू डब्यांतून नाहींसे व्हायचे. घरांतील पैसे नाहींसे व्हायचे. असा अनुभव घरांतील माणसांना येऊं लागला. कुलूप केलें

असतांही असें होत असे. ह्या हळवे मास्तरांची मुलगी सावंतवाडीच्या राणी पार्वतीदेवी हायस्कूलची हेडमास्तर आहे. त्या बाई एम. ए. बी. एड्. आहेत. त्यांना त्यांच्या आई-बहिणीला ही त्रासाची बाध झाली होती. आम्ही त्यांना ' दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ' हा जप म्हणायला सांगितला. त्याप्रमाणें त्यांच्या घरांतील माणसें रोज संध्याकाळीं हा जप करूं लागलीं व त्यांच्या घरचा हा त्रास दूर झाला. मृतात्मे काय करतात ह्याचें हें एक उदाहरण अलीकडचें बोलकें दिलें आहे.

सर्वांनाच मी मार्गदर्शन प्रत्यक्ष भेटून करणार नाहीं. मग त्यांची मला भेटण्याची इच्छा कितीही असो ! आजच्या काळांत पुस्तकें हीं मार्गदर्शक आहेत. म्हणून हा लिहिण्याचा प्रपंच केला.

धुंडिसुत मालुकवींनीं श्री नवनाथ भक्तिसार हा प्रासादिक व ईश्वरकृपा असलेला ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ भक्ति व अद्भुतरसानें भरलेला आहे. ह्या ग्रंथांतील ५ वा अध्याय समंधबाधा व घरांतील भूताचा संचार असेल तर तो थांबवतो. घरांत भूतबाधा होऊं देत नाहीं. रोज ह्या अध्यायाचें तीनदां वाचन करावयाचें आहे. काम असल्यास एकाच वेळीं तीनदां वाचलें तरी चालेल. चांगला दिवस पाहून पूर्वेकडे मुख करून ग्रंथवाचन आसनावर बसून करावें. चौरंगावर श्रीदत्ताची तसबीर व पोथी ठेवावी. श्रीगजाननाचें स्मरण करून देव व थोर मंडळींस नमस्कार करून पोथीचें व दत्तात्रेयांचें पूजन करावें. नैवद्यासाठीं पेढे, दूध, खडीसाखर, शक्य असल्यास वडे ठेवावे. वाचन चालू असतांना समई तेवत ठेवावी. धूप, नीरांजन दाखवावें. पहिल्या दिवशीं विडा, सुपारी, नारळ, दक्षिणा ठेवावी. अध्यायाचें वाचन चालू असतांना दुसऱ्याशीं बोलूं नये. रोज वाचन झाल्यावर दत्ताची आरती करावी. सहा महिन्यांनीं सांगता करतांना ब्राह्मण, सुवासिनीस

भोजन घालावें. भरल्याचे वडे, ताक, जोंधळ्याची खीर (आंबील), हरभऱ्याच्या घुगऱ्या प्रसादासाठीं कराव्या. नंतर ५ वा अध्याय वाचावा. सहा महिन्यांच्या आंत त्रास बरा झाला किंवा आठवड्यांत त्रास बरा झाला तरी सहा महिने पठण ठेवावें. म्हणजे पुनः त्रास होणार नाहीं.

नाथांची ही उपासना त्यांच्या प्रेरणेनें आम्ही व प्रकाशक लोकांपुढे ठेवत आहों. त्यानें अनेक दुःखितांना खात्रीची वाट मिळेल, समाधान, शांती व सुख वाट्याला येईल अशी खात्री वाटते.

भागीरथी निवास,
सावंतवाडी.

द. शं. केळकर

समंधबाधा, भूतबाधा निवारणारी नवनाथ उपासना

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी यदुकुळटिळका ॥ भक्तिपंकजाच्या[1] सदैव अर्का ॥ मुनिमानस-चकोरपाळका ॥ कृपापीयूषा[2] चंडा तूं ॥ १ ॥ भाविक प्रेमळ भक्त परी ॥ तयांचा असशी पूर्ण कैवारी ॥ बाळप्रल्हादसंकटावरी ॥ कोरडे काष्ठीं प्रगटलासी ॥ २ ॥ करविंशतिप्रताप[3] सघन ॥ संकटीं घातले देव तेणें ॥ तदर्थ सकळ रविकुळपाळण[4] ॥ अवतारदीक्षा मिरविसी ॥ ३ ॥ देवविप्रांचें संकट पाहून ॥ मत्स्यकुळातें करी धारण ॥ मग उदधीतें गगन दावून ॥ शंखासुर धरियेला ॥ ४ ॥ तेवींच दैत्य दुमदुमा करीत ॥ अवतार कच्छ झाला मिरवीत ॥ उदधी मंथूनि शंखा तोषवीत ॥ महाराज कृपार्णव ॥ ५ ॥ राया बळीची उद्दाम करणी ॥ स्वरूप मिरवी खुजटपणीं[5] ॥ संकट पडतां सुरगणी ॥ फरशधर[6] झालासे ॥ ६ ॥ अपार भक्तप्रेमा सघन ॥ त्यांत स्थिरावले पंडुनंदन ॥ शिशुपाळ-वक्रदंतकंदन ॥ वसुदेवकुशीं मिरवला ॥ ७ ॥ असो ऐसा भक्तिप्रेमा ॥ तूतें आवडे मेघश्यामा ॥ तरी आत्मभक्तिच्या उगमा ॥ पुढें ग्रंथ बोलवीं ॥ ८ ॥ मागिले अध्यायीं केलें कथन ॥ हिंगळाज क्षेत्रीं मच्छिंद्रनंदन ॥ अष्टभैरव चामुंडा जिंकून ॥ दर्शन केलें अंबेचें ॥ ९ ॥ तरी श्रोते सिंहावलोकनीं ॥ कथा पहा आपुले मनीं ॥ बारामल्हारमार्गी

---

१ भक्ति हेच जणूं कमल त्याच्या. २ कृपारूपी अमृता. ३ वीस हातांच्या रावणाचा पराक्रम. ४ सूर्यवंशांतील श्रेष्ठ राम. ५ बटूरूपानें वामन. ६ परशु धारण करणारा परशुराम.

धरूनी ॥ जाता झाला मच्छिंद्र ॥ १० ॥ तो बारामल्हारकाननांत ॥ मुक्कामा उतरला एका गांवांत ॥ देवालयीं मच्छिंद्रनाथ ॥ सुखशयनीं पहुडला ॥ ११ ॥ तों रात्र झाली दोन प्रहर ॥ जागृत आहे नाथ मच्छिंद्र ॥ तंव काननीं दिवट्या अपार ॥ मच्छिंद्रनाथें देखिल्या ॥ १२ ॥ इकडूनि जाती तिकडूनि येती ॥ ऐशा येरझारा करिती ॥ तें पाहूनि नाथ जती ॥ म्हणे भुतावळें उदेले ॥ १३ ॥ तरी यातें करावें प्रसन्न ॥ समय येत हाचि दिसून ॥ कोण्या तरी कार्यालागून ॥ उपयोगीं श्रम पडतील ॥ १४ ॥ तरी त्यातें आतां शरणागत ॥ प्रसन्न करूनि घ्यावें भूत ॥ श्रोते म्हणती कार्य कोणतें ॥ भूतास्त्राधीन असेल कीं ॥ १५ ॥ तरी ऐसें न बोलावें या वेळे ॥ भूत श्रीराम उपयोगी आलें ॥ राक्षसाचें प्रेत नेलें ॥ समरंगणीं सुवेळे ॥ १६ ॥ तेव्हां अमृत-दृष्टीकरून ॥ उठवी श्येन कपिरत्न ॥ तेवीं तुळसीसी प्रसन्न ॥ भूत झालें कलींत ॥ १७ ॥ तरी लहानापासूनि थोरापर्यंत ॥ समयीं कार्य घडूनि येत ॥ पहा अर्णवा झुरळें निश्चित ॥ वांचविलें म्हणताती ॥ १८ ॥ तन्न्यायें कल्पूनि चित्तीं ॥ नाथ भूतांच्या बैसल्या अर्थी ॥ मग अंबिकाअस्त्र स्पर्शशक्ती ॥ प्रेरिता झाला तेचि क्षणीं ॥ १९ ॥ तें अस्त्र प्रेरितां भूतगणीं ॥ होतां स्पर्श कुरुमेदिनीं ॥ मग पद धरी आंवळूनी ॥ सुटका नाहीं पदातें ॥ २० ॥ जेवी युद्ध कुरुक्षेत्रांत ॥ मही धरीतसे कर्णरथ ॥ चक्रें गिळूनि करी कुंठित ॥ गमनसंधान करूं नेदी

॥ २१ ॥ तन्न्यायें स्पर्शशक्ती ॥ करी भूतपदा धरा व्यक्ती ॥ चलनवलन मग त्या क्षितीं ॥ कांहींएक चालेना ॥ २२ ॥ जैसे तरू एकाचि ठायीं ॥ वसती अचळप्रवाहीं ॥ तन्न्यायें भूतें सर्वही ॥ खुंटोनियां टाकिलीं ॥ २३ ॥ तयां भूतांचे वियोगनिमित्ते[1] ॥ कीं वेताळा भेटी जाणें होतें ॥ सर्व मिळोनि येतां क्षितींत[2] ॥ जमोनियां येताती ॥ २४ ॥ तंव ते दिवशीं झाले कुंठित ॥ वेताळ भेटीच राहिली अप्राप्त ॥ येरीकडे वेताळक्षितींत[3] ॥ अनंत भूतें पातलीं ॥ २५ ॥ तो दक्षभूतांचा बळी वेताळ ॥ पाहे अष्टकोटी भूतावळ ॥ तों न्यूनपणीं[4] सर्व मंडळ ॥ दिसून आलें तयातें ॥ २६ ॥ मग अन्य भूतांतें विचारीत ॥ शरभतीरींची भूतजमात ॥ आली नाहीं किमर्थ ॥ शोध त्यांचा करावा ॥ २७ ॥ अवश्य म्हणोनि पांच सात ॥ गमन करिते झाले भूत ॥ शरभतीरीं येऊनि त्वरित ॥ निजदृष्टीं पहाती ॥ २८ ॥ तंव ते मंडळी महीं व्यक्त ॥ उभी असे चळरहित ॥ जैसा एका ठायींचा पर्वत ॥ दुसऱ्या ठायीं आतळेना[5] ॥ २९ ॥ मग त्या मंडळानिकट येऊन ॥ पुसते झाले वर्तमान ॥ तुम्ही व्यक्त महीलागून ॥ काय म्हणोनि तिष्ठलां ॥ ३० ॥ येरी म्हणती अनेक जे भेद ॥ महीं उचलोनि देतां पद ॥ कोण आला आहे सिद्ध ॥ तेणें कळा रचियेली ॥ ३१ ॥ मग ते पाहे कळा

१ वियोगामुळें. २ पृथ्वीवर. ३ वेताळाच्या भूमींत. ४ कांहीं कमी आहे असें वाटून. ५ हलेना.

घेऊन ॥ पर्वता चालिले शोधालागून ॥ गुप्तरूपें वस्तींत येऊन ॥ मच्छिंद्रनाथ पाहिला ॥ ३२ ॥ बालार्ककिरणीं तेजागळा ॥ शेंदूर चर्चिलासे भाळा ॥ तयामाजी विभूती सकळा ॥ मुखचंद्रें चर्चिली ॥ ३३ ॥ कर्णी मुद्रिका रत्नपाती ॥ कीं वस्तीस पातल्या रत्नज्योती ॥ हेमगुणी[1] गुंफोनि निगुती ॥ कचरींभारी[2] वेष्टिला ॥ ३४ ॥ ललाट[3] अफाट मिशा पिंगटा ॥ वटदुग्धानें भरल्या जटा ॥ सरळ नासिका नेत्रवाटा ॥ अर्धी समदृष्टी पहातसे ॥ ३५ ॥ अर्कनयनी विशाळ बहुत ॥ उग्रपणीं उदय दावीत ॥ पाहतां वाटे कृतान्त ॥ नेत्रतेजें विराजला ॥ ३६ ॥ स्थूळवट बाहुदंड सरळ ॥ आजानुबाहू तेजाळ ॥ कीं मलविमल करूनि स्थळ ॥ बहुवटीं विराजले ॥ ३७ ॥ मस्तकीं शोभली दिव्य विरगुंठी[4] ॥ कंथा विराजे पाठपोटी ॥ त्यावरी ग्रीवेसी नेसल्या दाटी ॥ ज्ञानशिंगी मिरवीतसे ॥ ३८ ॥ बाहुवटें हनुमंत ॥ वरिकंकण करीं शोभत ॥ कुबडी फावडा घेऊनि हातांत ॥ बोधशैलिका विराजे ॥ ३९ ॥ जैसा तीव्र बारावा रुद्र ॥ कीं सकळ योगियांचा भद्र ॥ जैसा नक्षत्रगणीं चंद्र ॥ तेजामाजी उभरतसे ॥ ४० ॥ ऐसें पाहुनि एक भूतीं ॥ मनामाजी करितां ख्याती ॥ येणेंचि व्यक्त केलें क्षितीं ॥ भूतगणा वाटतसे ॥ ४१ ॥ मग ते होऊनि संदेहस्थ ॥ नाथासी म्हणती भूतें पतित ॥ जाऊं द्या स्वामी करा मुक्त ॥ आपुलाल्या

---

१ सोन्याच्या तारेनें २. जटाभारानें. ३ भाळ. ४ जटा.

कार्यासी ॥ ४२ ॥ नाथ म्हणे सर्व गुंतले ॥ तुम्ही मुक्त केवीं राहिले ॥ येरू म्हणे पाठविलें ॥ समाचारा वेताळे ॥ ४३ ॥ तरी महाराजा करीं मुक्त ॥ जाऊं द्या वेताळनमनार्थ ॥ यावरी त्यांसी म्हणे नाथ ॥ सोडणार नाहीं सहसाही ॥ ४४ ॥ तुमचा वेताळ आदिराणीव[1] ॥ जाऊनि त्यातें त्वरें सांगावें ॥ येरू म्हणती मग अपूर्व ॥ भलें नोहे महाराज ॥ ४५ ॥ वेताळ खवळता बाबरदेव[2] ॥ हे महाबळाचे असती अष्टार्णव[3] ॥ ब्राह्मांड जिंकूनि कंदुकभाव[4] ॥ महीं खेळती महाराजा ॥ ४६ ॥ नवनाग जैसे सबळी ॥ तयां माजी फोडिती[5] कळी ॥ तयांसवें कोणी रळी[6] ॥ केली नाहीं आजन्म ॥ ४७ ॥ देव दानव गंधर्व असती ॥ तेही वेताळ बलाढ्य म्हणती ॥ तस्मात् स्वामी तयांप्रती ॥ श्रुत करूं नोहे जी ॥ ४८ ॥ येरु म्हणे संपादणी ॥ येथें काय करितां दाऊनी ॥ तुमचा वेताळ पाहीन नयनीं ॥ बळजेठी कैसा तो ॥ ४९ ॥ ऐसी ऐकूनी भूतें मात ॥ म्हणती अवश्य करूं श्रुत ॥ मग जाती जेथ तो वेताळ भूत ॥ तयापाशीं पातले ॥ ५० ॥ राया वेताळासी करूनि नमन ॥ सांगते झाले वर्तमान ॥ म्हणती महाराजा भूतांसी विघ्न ॥ जोगी एक आहे कीं ॥ ५१ ॥ तेणें खेळानि मंत्रशक्ती ॥ महीं व्यक्त[7] केली

---

१ प्रमुख. २ महाभयंकर. ३ अष्ट सागर. ४ चेंडूसारखे. ५ भांडणांत फोडून काढतात. ६ भांडण. ७ खिळवून टाकणे.

जमाती ॥ शेवटीं म्हणतो हेचि गती ॥ तुम्हां करीन महाराजा ॥ ५२ ॥ ऐसें ऐकूनि पिशाचराव ॥ परम क्षोभला विकृतिभाव ॥ म्हणे आतां अष्टका सर्व ॥ भूतावळ मेळवा ॥ ५३ ॥ मग भूतभृत्य[1] जासूद हलकारे ॥ जाते झाले देशांतरा ॥ अर्बस्थान पंजाब गुर्जरा ॥ बंगालादि पातले ॥ ५४ ॥ माळवी मेवाड तेलंगण । कर्नाटकी देश दक्षिण ॥ कुंडाळ कैकाड विलंबवचन ॥ सप्तद्वीपींचे पातले ॥ ५५ ॥ सकळां श्रुत करूनि गोष्टी ॥ पाठविती सकळ भूतथाटी ॥ अष्टराणीव एक एक कोटी ॥ समारंभा पातले ॥ ५६ ॥ अष्टराणीव तयांचे नांव ॥ महावीर विद्याकरणीं सर्व ॥ म्हंमद म्हैषासुर धुळोवान[2] गर्वे ॥ बाबर झोटिंग पातले ॥ ५७ ॥ मुंजा नरसिंहाचा अवतार ॥ म्हणोनि वीरांत त्याचा संचार ॥ तोहा एक कोटी भार ॥ घेऊनियां मिळाला ॥ ५८ ॥ असो ऐसे कोटीभार ॥ उतरले जैसे गिरिवर ॥ महाभद्र तो आग्या वेताळवीर ॥ येऊनियां पोहोंचला ॥ ५९ ॥ सकळ वेताळापाशीं येऊन ॥ कथिते झाले सिद्धगमन ॥ मग सकळ सांगूनि वर्तमान ॥ समारंभीं चालिले ॥ ६० ॥ येऊनि शरभतीराप्रती ॥ अष्टही कोटी कोल्हाळ[3] करिती ॥ तेणें दणाणी अमक्षिती ॥ आणि पाताळी आदळतसे ॥ ६१ ॥ तें पाहुनि मच्छिंद्रनाथ ॥ करीं कवळी विभूतिपात ॥ आराधूनि मंत्रशक्तीतें ॥ लखलखीत पैं केलें ॥ ६२ ॥ स्मरणगांडीव[4]

---

१ भूतसेवक. २ धूळ उडवीत येणारा. ३ कोलाहल, गोंगाट. ४ स्मरणरूपी धनुष्य.

विभूती शर ॥ सज्ज करिती अति तत्पर ॥ परी सर्वांचा प्रताप पहावया स्थिर ॥ महीं विराजे उगलाचि ॥ ६३ ॥ परी वज्रास्त्रमंत्र जपून ॥ भोंवतें वेष्टिलें रेषारंगण ॥ आणि मस्तकीं वज्रासन ॥ वज्रशक्ती मिरवीतसे ॥ ६४ ॥ तेणेंकरूनि भूतांचा प्रवेश ॥ लिप्त नोहे आसपास ॥ परी भूतावळ्या स्मशानास ॥ वर्षाव करिती आगळा ॥ ६५ ॥ जैसा पर्जन्याचया धारा ॥ वर्षाव करिती अपार अंबरा ॥ परी वज्रास्त्र सबळ मौळिभारा ॥ कदाकाळीं मानीना ॥ ६६ ॥ त्यांत अष्ट पिशाचनृपाळ ॥ स्वरूपेंकरूनि अति विशाळे ॥ तरू टाकिती उपटूनि बळें ॥ पर्जन्यधारांसारिखे ॥ ६७ ॥ परा तें वज्रास्त्र मौळीं ॥ तया न गणिती तये काळीं ॥ तरू संचवूनि पर्वतमौळी ॥ पर्णकुटी ती जाहली ॥ ६८ ॥ ऐसा संचरतां तरुभार ॥ काय करिते झाले समग्र ॥ कोरडें काष्ठादि तृण अपार ॥ तयावरी सांडिती ॥ ६९ ॥ सकळ करूनि महाकहर ॥ सांडिते झाले वैश्वानर[1] ॥ तें पाहूनि नाथ मच्छिंद्र ॥ जलदास्त्र प्रेरीतसे ॥ ७० ॥ भूतें सांडिती वैश्वानर ॥ तरू कडकडती ज्वाळपर ॥ ब्रह्मांडी उमाळा व्यापे थोर ॥ पक्षिकुळ जीवजंतु ॥ ७१ ॥ ऐसी पाहतां पावकथाटी[2] ॥ परी जलदास्त्रें[3] केली दाटी ॥ उदकें मिरवूनि आकाशापाठी ॥ शांत केला पावक तो ॥ ७२ ॥ यापरी मच्छिंद्रनाथ ॥ पावकास्त्र

१. अग्नि. २ अग्निज्वाला. ३ पर्जन्यास्त्र.

प्रेरिता झाला विभूतिमंत्र ॥ तेणें अग्नि प्रदीप्त करीत ॥ भूतगणीं मिरवीतसे ॥ ७३ ॥ परी तो दृश्य अदृश्य जाणोनी ॥ प्रळयाग्नि पाहती गुप्त होऊनी ॥ मग पहा उदधितोया सांडोनी ॥ आकाशांत मिरवूं स्या ॥ ७४ ॥ परी तो विझेना मंत्राग्न ॥ मग मच्छिंद्रें जलदास्त्र प्रेरून ॥ शांत केला हिमूर्धन[१] ॥ अस्त्रमंत्रें करूनियां ॥ ७५ ॥ शांत होताचि मंत्राग्नी ॥ महीं उतरला भूतगणीं ॥ मग स्पर्शास्त्र जल्पोनी ॥ भूतांगणीं कल्पीतसे ॥ ७६ ॥ तेणेंकरूनि अष्टकोटी ॥ महीं व्यक्त झाली एकथाटी[२] ॥ जैसी पूर्वी भूतांते राहटी ॥ तेंचि झालें सर्वांस ॥ ७७ ॥ परी अष्टजन जे तयांचे नृप ॥ महाबळी प्रतापदर्प ॥ ते स्पर्शास्त्र न गणती माप ॥ स्वबळें मिरविती ॥ ७८ ॥ परी स्पर्शास्त्रें एकचि केलें ॥ अदृश्य सकळ तेज खंडूनि धरिलें ॥ हें तों नेणोनि निकट आले ॥ मच्छिंद्रातें आकळावया ॥ ७९ ॥ परी भोंवतें आहे वज्र संपन्न ॥ लाग[३] न चाले कांहीं तेणें ॥ परी परम बलाढ्य वेताळसंधान ॥ निकट अंगें पातले ॥ ८० ॥ परी भोंवतें आहे वज्रास्त्र ॥ तेंचि मिळूनि गेला मुखपात्र ॥ हें मच्छिंद्र पाहतां अति विचित्र ॥ वासवास्त्र सोडीतसे ॥ ८१ ॥ वासवास्त्र होतां प्रगट ॥ उभयतांची झाली झगट ॥ जैसे जेठी लागूनि येत पाठ ॥ लोंबी[४] झोंबी खवळले ॥ ८२ ॥ एकमेकां महीं पाडिती ॥ तेणें दणाणा उठे क्षितीं ॥ अष्ट-

१ अग्नि. २ घोळका, गर्दी. ३ उपाय. ४ कुस्ती करण्यासाठी.

समुद्र हेलावती ॥ खळबळती नक्षत्रें पै ॥ ८३ ॥ शेषमस्तकें हेलावती ॥ कूर्म म्हणे त्या अति अद्भुती ॥ वराह सांवरूनि नेटे दंती ॥ महीलागीं उचलीतसे ॥ ८४ ॥ येरीकडे सप्तजन ॥ कवळ पाहती मच्छिंद्राचे चरणीं ॥ कीं चरणीं धरूनि महीकारण ॥ मच्छिंद्रनाथ आकळावा ॥ ८५ ॥ परी तो नाथ अति चपळ ॥ पुनः वज्रास्त्र सिद्ध केले सबळ ॥ दाही दिशा रक्षपाळ ॥ ऐसें वज्रास्त्र मिरविलें ॥ ८६ ॥ यावरी तो दानवास्त्र जल्पून ॥ दानव केले सप्त निर्माण ॥ मधु तिल कुंभकर्ण ॥ मरु आणि मालीमल ॥ ८७ ॥ मुचकुंद त्रिपुर बळजेठी ॥ ऐसी सप्त दानवहाटी ॥ साती देवतें बळजेठी । लोंबी झोंबी पातले ॥ ८८ ॥ झोटिंगातें मधु झगटे ॥ खेळताती कुंभक नेटें ॥ बावरातें कुंभकर्ण लोटे ॥ झोटधरणी[1] झगडती ॥ ८९ ॥ म्हंमदा लागीं मरु भिडत ॥ मालीमल मुंज्यातें आल्हाटीत[2] ॥ म्हैसासुर अति मुचकुंद उन्मत्त ॥ त्यातें भिडतसे ॥ ९० ॥ धुळोवान वीर समर्थ ॥ त्रिपुर झगटे तया निरत ॥ ऐसे एका मंत्री अस्त्र दैत्य ॥ सप्तजन आल्हाटिले ॥ ९१ ॥ ऐसे भिडतां अष्टजन ॥ महीं उठला अति दणाण ॥ एकमेकां महीकारण ॥ आकळावया ते जल्पीती[3] ॥ ९२ ॥ एक दिन एक रात्रीं ॥ साती जणां न विश्रांती ॥ लाथा केवड[4] हुमण्या[5] देती ॥ वर्मावर्मी जाणूनियां ॥ ९३ ॥

---

१ केस धरून. २ भिडणें. ३ ओरडतात. ४ कुशीवर पाडणें. ५ ठोसे.

तेणेंकरूनि प्रहार भेदीत ॥ भेदितां देह विकळ होत ॥ मुष्टिप्रहारें मूर्च्छित होत ॥ महीं तडती आदळोनि ॥ ९४ ॥ मग साती जणें दानवास्त्र ॥ भिडतां केलें त्या जर्जर ॥ मग सप्त दानव अदृश्यवर ॥ होते झाले एकसरें ॥ ९५ ॥ येरीकडे वासवशक्ती ॥ भिडतां प्रेमें वेताळाप्रती ॥ तों संधान पाहूनि हृदयस्थिती ॥ वासवशक्ती भेदीतसे ॥ ९६ ॥ तेणें घायें अति सबळ ॥ मूर्च्छित पडला वेताळ ॥ महीं पडतां उतावेळ[1] ॥ अदृश्य झाली शक्ती ते ॥ ९७ ॥ येरीकडे मच्छिंद्रनाथ ॥ वाताकर्षणविद्या जल्पत ॥ तों सांवरोनि वेताळ मूर्च्छित ॥ पुनरपि आला त्वरेनें ॥ ९८ ॥ येतां येतां सातीजणी ॥ लगट करिती निकट येऊनि ॥ तों सिद्धप्रयोग वाताकर्षणी ॥ मच्छिंद्राचा झालासे ॥ ९९ ॥ सिद्ध-प्रयोग होतां नीती ॥ संचारतो अष्टदेहांप्रती ॥ तेणेंकरूनि वातगती ॥ आकर्षण होतसे ॥ १०० ॥ जंव जंव आकर्षणघात होत ॥ तंव हस्तपादांचें चलन राहात ॥ परम क्लेश उचंबळत ॥ मूर्च्छा-शक्ती मिरवावया ॥ १ ॥ ऐसी होतांचि अष्टमावृत्ति[2] ॥ मग एकमेकांप्रती बोलती ॥ आतां आसडूनि[3] अहंवृत्ति ॥ शरण वेगीं रिघावें ॥ २ ॥ नातरी जोगी आहे कठिण ॥ भुतांसह आपुला घेईल प्राण ॥ तरी यातें प्रसन्न करून ॥ जागामाजी नांदावें ॥ ३ ॥ जैसे रामप्रसादें-

१ उताणा. २ आठवी आवृत्ति. ३ सोडून.

करून ॥ लंकाराणीव बिभीषण ॥ की वालीचे कृतीनें ॥ राज्यीं मिरवला सुग्रीव ॥ ४ ॥ तन्न्यायें येथें करून ॥ वांचवावा आपुला प्राण ॥ उपरी जीवालिया संगोपन ॥ आश्रय होईल हा एक ॥ ५ ॥ जैसा दरिद्रियाला परिस ॥ कीं चिंतामणी चिंतित्यास ॥ कीं पीयूष[1] लाभे रोगियास ॥ तैसें होईल आपणासी ॥ ६ ॥ कीं प्रल्हादाचें नरसिंह दैवत ॥ संकटीं झालें साह्यवंत ॥ तन्न्यायें आजही प्रीत ॥ वाढवावी महाराजा ॥ ७ ॥ ऐसें बोलूनि एकमेकां ॥ निश्चय करूनि नेटका ॥ म्हणती महाराजा तपोनायका ॥ सीमा झाली प्रतापा ॥ ८ ॥ तन्न्यायें सर्वज्ञमूर्ती ॥ सोडवीं आम्हां क्लेशपद्धती ॥ क्रोधानळे प्राणआहुती ॥ योजू नको महाराजा ॥ ९ ॥ तरी आतां अनन्य शरण ॥ आहोंत आमुचा वांचवा प्राण ॥ जैसें कचा शुक्रें दान ॥ संजीवनीचें पैं केलें ॥ ११० ॥ तूं प्रत्यक्ष असत्ती नारायण ॥ हें नेणोनि रळी[2] तुजकारण ॥ केली परी उचित धन ॥ प्राप्त झाले सध्यांचि ॥ ११ ॥ जैसा जटायु आणि संपाती ॥ प्रताप दापू गेले गभस्ती ॥ परी भोगदशाप्राप्ती ॥ सध्यांचि झाली लाभावरी ॥ १२ ॥ तन्न्यायें येथें झालें ॥ तरी कृपेचीं बसवीं पाउलें ॥ चलनवलन अवघेचि राहिलें ॥ बोलणें उरलें सांगावया ॥ १३ ॥ आतां क्षणैक करिसी आळस ॥ आम्ही जाऊं परठायास[3] ॥ तेणें लाभ

१ अमृत. २ आगळीक, भांडण. ३ मृत्यूप्रत.

तव हस्तास ॥ काय मिरवेल तुजलागीं ॥ १४ ॥ तरी आमुचा वांचवावा प्राण ॥ मग नाम तुझे मिरवूं जगाकारण ॥ सांगशील तें कार्य करून ॥ भूतांसहित येऊं कीं ॥ १५ ॥ कीं यमें पाळिले यमदूत ॥ किंवा विष्णू पुढें विष्णुगण धांवत ॥ तन्न्यायें आम्ही भूतांसहित ॥ तुजपुढें मिरवूं कीं ॥ १६ ॥ हें जरी म्हणशील खोटें ॥ तरी पूर्वजां बुडवूं नरककूपाटें ॥ आणि पंचपातकें महानेटें ॥ निजमस्तकीं मिरवूं कीं ॥ १७ ॥ गोहत्यारी ब्रह्महत्यारी ॥ स्त्रीहत्यारी बाळहत्यारी ॥ मातृपितृगुरुहत्यारी ॥ पंचपातकें मस्तकीं मिरवूं कीं ॥ १८ ॥ ऐशीं पातकें रौरव क्षितीं ॥ भोग मिरवूं संवत्सरअयूतीं[1] ॥ यातें साक्ष चित्रगुप्ती ॥ लीनमुखपदा[2] मिरवूं कां ॥ १९ ॥ ऐसे आमुचे बोल निश्चित ॥ काया वाचा धरूनि निश्चित ॥ तरी आतां होई कृपावंत ॥ दयालहरी मिरवावी ॥ १२ ॥ यावरी बोले मच्छिंद्रनाथ ॥ साबरीविद्या मम कवित्व ॥ त्यातें साह्य भूतांसहित ॥ कार्यार्थी तुम्हीं असावें ॥ २१ ॥ जो जो मंत्र जया प्रकरणीं ॥ तरी त्या अर्थी तुम्ही वर्तोनी ॥ साह्य करावें मंत्रालागुनी ॥ कोणी तरी घोकिलिया ॥ २२ ॥ मग अष्टही म्हणती अवश्य ॥ कार्य करूं निःसंशयास ॥ मग साधनप्रयोग आपुला भक्ष[3] ॥ पृथक् पृथक् सांगितला ॥ २३ ॥ अष्टकोटी भूतावळीसहित ॥ भक्षसाधन सांगितलें

१ अनेक वर्षपर्यंत. २ पायांशीं विनम्र राहूं. ३ उद्दिष्ट.

समस्त ॥ येणें पथें कार्य जगांत ॥ निश्चयें आम्ही मिरवू कीं ॥ २४ ॥ पूजा पुरस्कार अभ्युत्थान ॥ मंत्रासहित निर्वाण ॥ मंत्र उजळला स्थापूनि ग्रहण ॥ पर्वणीतें नेमिलें ॥ २५ ॥ ऐसा निश्चय सांग होतां ॥ मग बळें प्रेरकास्त्र प्रेरितां ॥ समूळ नासूनि गेली वार्ता ॥ आकर्षण-अस्त्राची ॥ २६ ॥ येरीकडे अष्टकोटी भूतावळ ॥ जोगिणी इत्यादि सकळ ॥ स्पर्शू पहाती चरणकमळ ॥ महीं व्यक्त होऊनिया ॥ २७ ॥ तेव्हां जल्पूनि विमुक्तास्त्र ॥ मुक्त केले पिशाच सर्वत्र ॥ मग मच्छिंद्रपद नमूनि पवित्र ॥ सन्मुख उभे राहती ॥ २८ ॥ बद्धांजुळी[1] उभय कर ॥ उभे असती ते समोर ॥ वाणी वदले जयजयकार ॥ धन्य मच्छिंद्र म्हणोनी ॥ २९ ॥ मग त्या मंडळींत मच्छिंद्र ॥ कैसा शोभला मूर्तिमंत ॥ जेवीं नक्षत्रांमाजी तेजोमंत ॥ शशिनाथ मिरवला ॥ १३० ॥ कीं रश्मिपालमंडळांत[2] ॥ तेजे गहिंवरला प्रभे आदित्य ॥ कीं सुरवरगणीं[3] शचीनाथ[3] ॥ स्वर्गामध्यें मिरवला ॥ ३१ ॥ कीं शिवगण समुदायीं ॥ परम शोभत नगजावई[4] ॥ कीं विष्णुगुणांत शेषशायी[5] ॥ प्रभुत्वपणीं मिरवला ॥ ३२ ॥ कीं दानवांमाजी उशगनामूर्ती[6] ॥ कीं देवामाजीं बृहस्पती ॥ कीं पृतनेमाजी[7] ऐरावती ॥ देवांगणीं मिरवि तसे

---

१ हात जोडून. २ सूर्यमंडळांत. ३ देवामध्यें इंद्र. ४ हिमनगाचा जांवई शंकर. ५ शेषावर निद्रा करणारा विष्णू. ६ शुक्राचार्य. ७ सैन्यामध्यें.

॥ ३३ ॥ तेवीं पिशाचमंडळांत ॥ परम शोभला मच्छिंद्रनाथ ॥ मग सकळांच्या मस्तकीं ठेवूनि हात ॥ म्हणे क्षेमवंत असावे ॥ ३४ ॥ अष्टजण मुख्य नायक ॥ ते बोलती बोलावून सकळिक ॥ कीं मच्छिंद्र कार्य श्लोक ॥ जगउपकारा बदला असे ॥ ३५ ॥ तरी त्याचा धाक कोणीं ॥ तया साह्य पिशाच असावें येऊनी ॥ सांगितलें याचे कार्य द्या करूनि ॥ मंत्रोच्चार होतांचि ॥ ३६ ॥ ऐसे ऐकोनियां भूते ॥ अवश्य म्हणती जोडोनि हात ॥ यावरी बोले मच्छिंद्रनाथ ॥ आणिक वर मज द्यावा ॥ ३७ ॥ तुमचे आमुचे समरांगण ॥ झाले सबळ बळेंकरून ॥ त्या समरांगणाचें कथन ॥ लोकीं ऐसें मिरविलें ॥ ३८ ॥ तरी तें आख्यान वाचितां ॥ तया न करावी बाधा सर्वथा ॥ आणि हें आख्यान संग्रहीं पाळितां ॥ प्रिय मानावा तो पुरुष ॥ ३९ ॥ त्यासी जरी संकट येतां ॥ निवारण करावें तुम्हीं सर्वथा ॥ आणि आपुलेकडूनि सहसा व्यथा ॥ जाणूनि त्या पुरुषा करूं नये ॥ ४० ॥ हें आख्यान राहे जया सदनीं ॥ तेथें बसूं नये सहसा भूतांनीं ॥ जैसें भाद्रपदशुद्ध चतुर्थीदिनीं ॥ चंद्रा-लागीं न देखती ॥ ४१ ॥ कीं अविंध[1] जेवीं का सूकर[2] ॥ कीं श्वान[3] मानिती अशुद्ध विप्र ॥ तेवीं तें मानूनि सर्वत्र ॥ दूरदेशा असावें ॥ ४२ ॥ ऐसें आणूनि चित्तीं ॥ तें सदन स्पर्शू

---

१ मुसलमान. २ डुक्कर. ३ कुत्रा.

नये भूतीं ॥ अस्पर्श होतां व्यथा किंचित ॥ होणार नाहीं भूतांची ॥ ४३ ॥ यावरी प्रशस्तपणें राहून ॥ जरी त्या सदना आलें विघ्न ॥ तयाचें करावें निवारण ॥ सकळ भूतें मिळोनियां ॥ ४४ ॥ आणि तया घरचें मनुष्य व्यर्थ ॥ जरी भेटलें जातां मार्गांत ॥ तरी मार्ग सोडूनी निश्चित ॥ दूर मार्गीं बैसावें ॥ ४५ ॥ हें आख्यान जो पाळिता ॥ त्यासी कदाकाळीं न करावी व्यथा ॥ हेंचि द्यावें मज सर्वथा ॥ कृपा करूनि सर्वांनीं ॥ ४६ ॥ ऐसी ऐकूनि मच्छिंद्रउक्ती[1] ॥ अवश्य करूं सकळ म्हणती ॥ त्या सदनातें व्यथा निश्चितीं ॥ आम्ही न करूं सहसाही ॥ ४७ ॥ ऐसें वदूनि वरदभूत[2] ॥ नमिता झाला मच्छिंद्रनाथ ॥ सर्व नमूनि पुसून त्यातें ॥ स्वस्थानातें चालिले ॥ ४८ ॥ अष्टकोटी पिशाचांसहित ॥ अष्ट विराजे मुख्य दैवत ॥ तेही नमूनि मच्छिंद्राप्रत ॥ स्वस्थानासी पै गेले ॥ ४९ ॥ येरीकडे मच्छिंद्रनाथ सत्वर ॥ पाहता झाला बारामल्हार ॥ तेथीचा विधी करूनि सर्व ॥ कुमारी दैवतीं चालिला ॥ ५० ॥ तैशीच पावे कालिका भवानी ॥ ते कथा पावेल मच्छिंद्रालागुनी ॥ ते पुढिले अध्यायीं अवधान देऊनी ॥ कथा श्रोते स्वीकारा ॥ ५१ ॥ अहो या कथासारग्रंथास ॥ परिकर[3] पंचम अध्याय घोकिल्यास ॥ पिशाचबाधा तयासी खास ॥ होणार नाहीं सह-

---

१ मच्छिंद्रनाथाचें वचन. २ वर देणारा बेताळ. ३ सुरस.

साही ॥ ५२ ॥ जरी पहिली बाधा असेल ॥ तरी तो पठण करितां जाईल ॥ प्रथम अध्याय जो घोकील ॥ त्याचा अंगरोग जाईल कीं ॥ ५३ ॥ दुसरा अध्याय घोकिल्यापासून । विद्याभ्यास होईल पूर्ण ॥ तिसरा अध्याय घोकितां प्रसन्न ॥ होईल अंजनीसुत तयातें ॥ ५४ ॥ चवथा अध्याय घोकितां फळ ॥ कार्य निवटील[1] परम सकळ ॥ मान्यता[2] देईल महीपाळ ॥ मौन पडेल[3] सर्वांतें ॥ ५५ ॥ असो ऐसे पंचम प्रसंग ॥ मंत्रसंजीवनी अनुराग ॥ धुंडीसुत मालूजी सांग ॥ वदे नरहरीकृपेकरूनियां ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीभक्तिकथासार ॥ संमत गोरक्ष-काव्य किमयागार ॥ सदा परिसोत भाविक चतुर ॥ पंचमाध्याय गोड हा ॥ ५७ ॥ अध्याय ॥ ५ ॥ ओंव्या ॥ १५७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

---

१ तडीस नेईल. २ मान. ३ सर्व आश्चर्याने थक्क होतील.

(४) **श्रीदत्त यंत्र** : ब्रह्मा, विष्णू, महेश हीं तीन महान दैवते श्रीदत्तात्रेयांमध्ये एकत्रित झाली आहेत. नृसिंहसरस्वती, श्रीपादवल्लभ या दत्तावतारांनी या यंत्राचा साऱ्या देशभर प्रचार केला. प. पू. गुळवणीमहाराज ह्या यंत्राचा वापर करण्याचा आपल्या अनुयायांना नेहमी आग्रह करत. महत्प्रयासाने बनवलेले हे यंत्र आपल्या सर्व मनोकामना पुऱ्या करील.

(५) **श्रीगायत्री यंत्र** : श्रीगायत्रीदेवीचा महिमा कुणा हिंदूला सांगायलाच नको. श्रीगायत्रीदेवीचे यंत्र ऋग्वेदकाळापासून प्रचारात आहे. धनप्राप्ती, विद्यालाभ, विवाह, गृहशांती, सुखसमाधानाच्या प्राप्तीसाठी गायत्रीदेवीचे यंत्र जवळ ठेवणे फायद्याचे आहे.

(६) **श्रीरामरक्षा यंत्र** : हे यंत्र साधकाला कल्पवृक्षाप्रमाणे आहे. साधकांच्या सर्व मनोकामना, लहान बालकाचे किरकिरणे, गृहशांती, भूतप्रेतबाधा, नजर लागणे, असाध्य रोग बरे होणे असे अगस्तिसंहितेत याचे महत्त्व सांगितले आहे.

(७) **श्रीमहामृत्युंजय यंत्र** : श्रीभगवान शंकरालाच आपण संहारकारक मानतो. श्रीशंकराचे नामस्मरणच मृत्यूला दूर करू शकते. हे यंत्र जवळ बाळगणाऱ्याचे असाध्य रोग बरे होतात. मरणोन्मुख मनुष्याला जीवदान प्राप्त होते.

(८) **श्रीमार्कण्डेय ऋषीप्रणीत श्रीदेवी यंत्र** : नवरात्रात साऱ्या हिंदुस्थानात प्रत्येक हिंदू सप्तशतीचा पाठ, देवीची पूजाअर्चा करतोच करतो. या यंत्राचा प्रचार आर्यांच्या आगमनापासून होत आलेला आहे. या यंत्राच्या पूजनाने देवी आर्त भक्ताच्या सर्व मनोकामना पूर्ण करते.

(९) **श्रीवशीकरण यंत्र** : हे यंत्र तांत्रिक शाबत पंथाच्या भक्तांमध्ये प्राचीन काळा-पासून प्रचलित आहे. वशीकरण, संमोहन, सर्वसिद्धी, कार्यसिद्धी हे यंत्र जवळ बाळगण्याने प्राप्त होतात.

(१०) **गोसावी पंथाचे ग्रहपीडा निवारण यंत्र** : पुण्याच्या सोमवार पेठेतील लक्ष्मीनारायण मंदिरात फार प्राचीन काळापासून हे यंत्र शिळेवर कोरलेले आहे. नवग्रहाच्या शांतीसाठी प्रत्येक ग्रहाचे कवचाचे पाठ करण्यापेक्षा हे यंत्र जवळ बाळगण्याने तेवढेच फळ मिळणार हे निश्चित.

(११) **शाबरी यंत्र** : शाबरी मंत्रांचे व यंत्राचे मुख्य प्रणेते श्रीगोरक्षनाथ होते. हे निश्चित. हे यंत्र अतिशय गुप्त व दुर्मिळ आहे व ते फक्त नवनाथपंथी साधूंनाच माहीत होते. एका नवनाथपंथी बाबाजीकडून महत्प्रयासाने मिळविलेले हे यंत्र तुम्हाला एक वरदानच आहे.

* ही सर्व यंत्रे जाड तांब्याच्या पत्र्यावर कोरलेली असून अनुष्ठानाने सिद्ध केलेली आहेत. प्रत्येक यंत्राची किंमत १५ रुपये, अधिक पोस्टेज ३ रुपये, एकूण १८ रुपयांची म. ऑ. करणाऱ्यालाच पाठवली जातील. यंत्रे V. P. P. ने पाठविली जाणार नाहीत. ही यंत्रे फक्त **श्रीगजानन बुक डेपो,** भरत नाट्य मंदिरासमोर **पुणे,** ३०; व **श्रीगजानन बुक डेपो,** कबुतरखान्यासमोर, दादर **मुंबई** २८ येथेच फक्त मिळतील. अनेक पुस्तकविक्रेते "ही यंत्रे श्रीगजानन बुक डेपोने आमच्याकडे विक्रीस दिली आहेत." अशी वाचकांची दिशाभूल करतात. तरी कृपया वाचकांनी वरील दोन पत्त्यांशिवाय इतरत्र ही यंत्रे घेऊ नयेत.

:: :: ::